# जिल्ह्यात इंधनाचा पुरेसा साठा; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे प्रशासनाचे आवाहन

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

यासंदर्भात जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी एक आदेशही जारी केला आहे. त्यांनी माहिती दिली आहे की, गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर इंधन टंचाईबाबत अफवा पसरविल्या जात असल्याने पेट्रोल पंपांवर नागरिकांची अनावश्यक गर्दी होत आहे. ही परिस्थिती टाळण्यासाठी तसेच



सर्वांना समान प्रमाणात इंधन मिळावे यासाठी प्रशासनाने इंधन वितरणाचे योग्य नियोजन केले आहे.

प्रशासनाने नागरिकांच्या हितासाठी काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यानुसार, सर्व वाहनांना इंधन मिळावे यासाठी दुचाकी वाहनांना २०० रुपयांपर्यंत आणि चारचाकी वाहनांना २००० रुपयांपर्यंत इंधन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, ज्यामुळे कोणाचीही गैरसोय होणार नाही.

तसेच, सुरक्षेच्या दृष्टीने इंधन साठवणूक धोकादायक ठरू शकते, त्यामुळे कॅन किंवा बाटल्यांमध्ये इंधन न घेता थेट वाहनांमध्येच इंधन भरून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवांना प्राधान्याने इंधन पुरवठा सुरू ठेवण्यात येणार आहे.

प्रत्येक पेट्रोल पंपावर इंधनसाठ्याची माहिती फलकावर दर्शविण्यात येणार असून नागरिकांना खरी परिस्थिती समजून घेता येईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, जिल्ह्यात इंधनाचा कोणताही तुटवडा नाही. नागरिकांनी शांतता राखून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पिंपळनेरच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा ; पिंपळनेरच्या लेकीची बीड पोलीस दलात निवड

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

पिंपळनेर येथील युवक पांडुरंग नरवडे यांची लातूर पोलीस दलात नियुक्ती झाली असतानाच त्यानंतर आता पिंपळनेर येथील कु. शितल अवधूत गवळी हिने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर बीड पोलीस दलात स्थान मिळवून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे .



त्यामुळे पिंपळनेर च्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा रोवला आहे. विशेष म्हणजे शितलच्या वडिलांचा व्यवसाय शेती असून अत्यंत साध्या परिस्थितीतून तिने हे यश संपादन केले आहे. १२ वी नंतर शितलने बीड शहरात शिक्षणासोब अनेकदा विविध विभागाच्या क्षेत्रात परीक्षा देऊन प्रयत्न केले होते, तेव्हा अपयश आलं पण तिने जिद्द सोडली नाही आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवले तिच्या या जिद्दीपुढे सर्व अडथळे दूर करत आज अखेर तिचे स्वप्न साकार झाले. शेतकरी कुटुंबातील मुलीने पोलीस दलात भरारी घेतल्याने पिंपळनेर गावात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावकऱ्यांकडून व मित्रपरिवाराकडून तसेच विविध मान्यवरांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. शितल गवळी हिच्या या यशामुळे ग्रामीण भागातील अनेक मुला मुलींना प्रेरणा मिळणार असून जिद्द असेल तर यश नक्की मिळते हे पुन्हा एकदा पिंपळनेरकरांना या लेकीने सिद्ध करून दाखवले आहे.

## रामनवमीच्या निमित्ताने 'मातोश्री' संस्थेचा स्तुत्य उपक्रम

# शिवणी येथील भिल्ल वस्तीत वृक्षवाटप व 'एक झाड एक जीवन' अभियान उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

दि.२६.०३.२०२६ रोजी प्रभू श्री रामचंद्रांच्या जन्मोत्सवाचे म्हणजेच रामनवमीचे औचित्य साधून 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड' यांच्या वतीने शिवणी (ता. जि. बीड) येथील सानप वस्ती व भिल्ल वस्तीमध्ये 'एक झाड एक जीवन' अभियानांतर्गत वृक्षारोपण आणि नागरिकांना वृक्ष वाटपाचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला.

श्रीरामांचा जन्म त्रेतायुगात झाला, आज या घटनेला हजारो वर्षे उलटून गेली असली तरी त्यांचे



विचार आजही जिवंत आहेत. श्रीरामांनी आपला १४ वर्षांचा वनवास निसर्गाच्या सान्निध्यात व्यतीत केला. पशू-पक्षी, वृक्ष-वेली आणि नद्यांचा त्यांनी नेहमी आदर केला. प्रभू श्रीरामांचा हाच निसर्गप्रेमाचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश खऱ्या अर्थाने कृतीत उतरवण्यासाठी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने संस्थेच्या अभियान प्रमुख तेजस्विनी दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला.

सध्याचे वाढते तापमान आणि पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास पाहता निसर्ग संवर्धन ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे नुसतीच झाडे लावून न थांबता, यावेळी उपस्थित ग्रामस्थांना आणि महिलांना वृक्षांचे वाटप करण्यात आले. 'एक झाड एक जीवन' या संकल्पनेनुसार प्रत्येक कुटुंबाने किमान एक झाड लावून ते आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे जगवावे आणि त्याचे संवर्धन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.या सामाजिक उपक्रमाला स्थानिक नागरिकांनी अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी संस्थेचे सचिव तेजस पवार,रोहन डोळस,सर्व पदाधिकारी, सदस्य आणि शिवणी येथील भिल्ल वस्तीतील आबालवृद्ध नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामनवमीचा उत्सव केवळ पारंपरिक पद्धतीने न साजरा करता पर्यावरणपूरक उपक्रमाने साजरी करण्यात आली.

## माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथे पोलीस पाटील पदासाठी सुरेश विण्णु खेत्री यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव इथे नुकतीच पोलीस पाटील प्रक्रिया पार पडली असून, या निवडीत सुरेश विष्णु खेत्री यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मोठेवाडी हे सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या प्रगत गाव म्हणून ओळखले जाते. गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस पाटील पदाला विशेष महत्त्व आहे. या पदासाठी अनेक इच्छुक उमेदवारांनी अर्ज केले होते. मात्र, त्यांच्या कार्यक्षमता, सामाजिक सहभाग आणि गावातील लोकांमध्ये असलेला विश्वास या बाबींचा विचार करून सुरेश विष्णु खेत्री यांची निवड करण्यात आली. सुरेश खेत्री हे गावातील सक्रिय व जबाबदार व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांनी यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेतला असून, गावाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या निवडीमुळे गावातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. निवडीनंतर गावातील ज्येष्ठ नागरिक, तरुण वर्ग आणि विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी सुरेश विष्णु खेत्री यांनी गावाच्या सेवेसाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. गावातील प्रत्येक नागरिकाच्या सुरक्षिततेसाठी आणि समस्यांच्या तात्काळ निवारणासाठी मी कटिबद्ध राहीन, असे त्यांनी सांगितले. या निवडीमुळे मोठेवाडीच्या प्रशासनात नवे नेतृत्व मिळाले असून, आगामी काळात गावाच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा जगन सखाराम खेत्री यांनी व्यक्त केली आहे.

# तालखेड वीजप्रश्नावर तोडगा; लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील मौजे तालखेड येथे गेल्या एक ते दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या वीजपुरवठा समस्येमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी छेडलेले आमरण उपोषण अखेर मागे घेतले आहे. महावितरणकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

तालखेड येथे वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते. वीजबिल वसुलीत आघाडीवर असूनही तसेच वीज चोरीचे प्रमाण शून्य असतानाही अपुरा वीजपुरवठा मिळत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. यावर तोडगा न निघाल्याने २५ मार्च २०२६ पासून आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते.



या उपोषणात कैलास मोरे, गुलाबराव मोरे, पंडित ओव्हाळ, रेवन यादव, दिनकर रिंगणे, राजाभाऊ परदेशी, नितेश खोटे, फरिद पठाण, वैभव मोरे, अनिल गायकवाड, सोपानराव वीर, आबासाहेब मोरे, रमेश शेंडगे, दयानंद जाधव आदी ग्रामस्थ सहभागी झाले होते.

ग्रामपंचायत तालखेडच्या वतीने सरपंच सौ. गितांजली गुलाब मोरे, उपसरपंच श्री. पंडित बन्सी ओव्हाळ, ग्रामविकास अधिकारी श्री. सुग्रीव भारत भारती व सदस्यांनी उपविभागीय अभियंत्यांना निवेदन देत तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली होती. उपोषणादरम्यान महावितरण विभाग व ग्रामस्थ यांच्यात बैठक घेण्यात आली. यामध्ये माजलगाव उपविभागातील ३३ केव्ही मालीपारगाव वाहिनीवर अतिरिक्त भार पडत असल्यामुळे वारंवार वीज खंडित होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.समस्येच्या कायमस्वरूपी तोडग्यासाठी चडघतध २.० योजनेअंतर्गत नवीन ३३ केव्ही लिंक लाईन मंजूर करण्यात आली असून दोन उपकेंद्रांचे विभाजन करण्यात येणार आहे. आवश्यक साहित्य १० ते १२ दिवसांत उपलब्ध करून अंदाजे १५ दिवसांत काम पूर्ण केले जाईल, असे लेखी आश्वासन महावितरणकडून देण्यात आले. दरम्यान, विजय दादा साळवे यांनी दोन्ही बाजूंमध्ये समन्वय साधत महत्त्वाची मध्यस्थी केली. त्यांच्या प्रयत्नांमुळे ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेत प्रशासनाला सहकार्य करण्याचा निर्णय घेतला.

तथापि, दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला असून आता महावितरणच्या कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बलभीम महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. २५ मार्च २०२६ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते. आनंदनगरीचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांच्या हस्ते झाले. आनंदनगरीत विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थांचे स्टॉल लावले होते. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. यासोबतच मनोरंजनाच्या खेळांचेही विद्यार्थ्यांनी यावेळी आयोजन केले होते तसेच पारंपारिक वेशभूषा या प्रकारातही विद्यार्थी व प्राध्यापकांनी सहभाग घेतला. दुपारच्या सत्रात संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सांस्कृतिक समारंभाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संतोष उंदरे यांच्या हस्ते झाले. या सांस्कृतिक कार्यक्रमात संगीत विभागातील प्रा. सचिन राऊत, प्रा. अक्षय कोकाटे, नाट्यशास्त्र विभागातील प्रा. केशव भागवत, प्रा. प्रविण निसर्गंध यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी भावगीते, भक्तिगीते, लोकगीते, लावणी, नृत्य, मिमिक्री असे विविध प्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.बाबासाहेब कोकाटे, डॉ.संतोष डुबल, आय. क्यु.ए.सी.समन्वयक डॉ. अनिल चिंधे, प्रभारी प्राध्यापक डॉ. मनोहर सिरसाट, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. रविंद्र काळे, प्रबंधक पी.पी.पी.डावकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संयोजन समिती व सांस्कृतिक विभागाने परिश्रम घेतले.

## बऱ्हाणपूर येथे रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरण काम सुरु : लांडे

**बीड । प्रतिनिधी**

बऱ्हाणपूर येथे ग्रामस्थांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरण कामास प्रारंभ करण्यात आला. हे काम माननीय नामदार मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून मंजूर झाले असून या कामासाठी भाजप जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे यांनी विशेष पाठपुरावा केला आहे. गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते भूमिपूजन करून कामाचा शुभारंभ करण्यात आला. गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली होती. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात रस्ता चिखलमय होत असल्याने बैलगाड्या, ट्रॅक्टर व दुचाकी वाहने चालविणे



कठीण होत होते. आता रस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे सोपे होणार असून शेतमाल वाहतूक करणे सुलभ होणार आहे.

रस्त्याच्या खडीकरणामुळे बैलांच्या पायांना होणाऱ्या इजा कमी होतील, वाहने घसरण्याचे प्रमाण कमी होईल, तसेच विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी व ग्रामस्थांना ये-जा करण्यासाठी मोठी सोय होणार आहे. या कामामुळे गावाच्या विकासाला चालना मिळणार असून ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. हे काम जिल्हा नियोजन निधीतून माननीय नामदार मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून मंजूर झाले असून ग्रामस्थांनी याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. या प्रसंगी भाजप जिल्हा सरचिटणीस गणेश लांडे, बऱ्हाणपूर ग्रामपंचायत सदस्य अतुल लांडे, बाळनाथ लांडे, सिद्धेश्वर मस्के, राजेभाऊ क्षीरसागर, रोहिदास लांडे, अचीत लांडे, सदाशिव लांडे, राम मनरूपे, विलास लांडे, दादासाहेब लांडे, चंद्रशेखर क्षीरसागर आदी ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये शहीद दिनानिमित्ताने महापुरुषांना अभिवादन



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये शहीद दिनानिमित्ताने भगतसिंग, सुखदेव व राजगुरू या महापुरुषांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधिक्षक सुभाष वायाळ, सांस्कृतिक विभागाचे सदस्य डॉ. अशोक लाखे, प्रा. नागोराव वाघमारे, डॉ. नितीन कुंभार, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड त्यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी वर्ग व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## घरकुल लाभार्थ्यांना मिळतेय मोफत वाळु

### – अनिलराधे कांबळे यांच्या पावसातील आंदोलनास यश
### – लाभार्थ्यांनी मानले अनिलराधेंचे आभार

**माजलगाव । प्रतिनिधी**

घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळु मिळावी यासाठी उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते अनिलराधे कांबळे यांनी तहसिल कार्यालयासमोर भर पावसात आंदोलन केले होते तर याप्रश्नी सतत पाठपुरावा केल्याने दखल प्रशासनाने घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळु देण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना दिलासा मिळाला असुन अनेक लाभार्थ्यांनी आंदोलक अनिलराधे कांबळे यांचे आभार मानले आहे.

येथील सामाजिक कार्यकर्ते अनिलराधे कांबळे यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या वाळुप्रश्नावर शासनाचे लक्ष वेधुन घेण्यासाठी भर पावसात आंदोलन केले होते तर महसुलमंत्र्यांची भेट घेत मोफत




वाळु धोरण फक्त कागदोपत्री न राबविता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी अशी आग्रही मागणी केली होती. तसेच या प्रश्नावर सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा देखिल केला होता. त्यामुळे याप्रकरणी शासनाने दखल घेत ब्रम्हगावसह अनेक ठिकाणी पात्र घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळु देण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे अडगळीत पडलेल्या, थांबलेल्या बांधकामांना वाळुमुळे वेग आला आहे. अनेक सर्वसामान्यांच्या घराचे स्वप्न पुर्ण होण्यास मदत मिळत असल्याने घरकुल लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. दरम्यान वाळु प्रश्नी शासनदरबारी आवाज उठवुन लाभार्थ्यांना न्याय मिळवुन दिल्याबद्दल अनेक घरकुल लाभार्थ्यांनी आंदोलक अनिलराधे कांबळे यांचे आभार मानले आहेत.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार दि. २७ मार्च २०२६ •



*बीड : पिंपळनेर येथे अवधूत गवळी यांची मुलगी कुं शितल अवधूत गवळी हिची बीड पोलीस दलात निवड झाल्याबद्दल वडील व तिचा सत्कार करून पुढील वाटचालीस मनपुर्वक शुभेच्या दिल्या यावेळी माजी.जी. प.सदस्य गणपत आप्पा डोईफोडे, संपादक अशोक होळकर,पत्रकार गणेश तांबे, गोरख नाना कांडेकर, बाबुराव भाऊ नरवडे, अमर शेख, उमेश पवार, उपसरपंच शंकर कदम, भैय्या कदम, दीपक गवळी,ज्ञानेश्वर गवळी, महादेव गवळी, सुनील ठोकरे, यांच्यासह अनेक उपस्थित होते.*



*बीड: श्री. पांडुरंग गवळी यांचे सुपुत्र चि. उमेश गवळी यांनी पिंपळनेर शहरात VIP Paan Shop या नूतन व्यवसायाचा श्रीगणेशा केला आहे. या शॉपच्या उदघाटन प्रसंगी सरपंच तथा पिंपळनेर जिल्हा परिषद सदस्य गणपत आप्पा डोईफोडे यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या व पानाचा आस्वाद घेतला, चवीमध्ये खरोखरच 'व्हीआयपी' अनुभव आणि प्रसन्न वातावरण! उमेशला या नवीन व्यवसायासाठी आणि पुढील वाटचालीस माझ्याकडून खूप खूप शुभेच्छा! असाच प्रगतीचा आलेख उंचावत राहो.*

## इ. १० वी १२ वी विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या...

# आपले सरकार प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरण्याची प्रक्रीया सुरु

**बीड । प्रतिनिधी**

इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज मागविले जातात. सन २०२५-२६ मध्ये ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रीया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करून देण्यात आली. बीड जिल्हयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक खेळाडू यांना आहे. जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे. खेळाडु विद्यार्थी / जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार पोर्टलवर URL: https://aaplesarkar.mahaolline.gov.in या लिंकद्वारे सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून स्विकारला जाणार नाही जर अशी बाब कार्यालयाच्या निदर्शनास आली तर त्यासंदर्भात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था जबाबदार राहतील असे जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे. एकविध जिल्हा क्रीडा संघटने (असोसिएशन) मार्फत जिल्हा / विभाग / राज्य / राष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेले शासन निर्णयातील पात्र खेळाचे खेळाडूंचे प्रस्ताव आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने दि. ३१ मार्च २०२६ रोजी पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

संघटनेमार्फत खेळलेल्या खेळाडूचे प्रस्ताव बोर्डास सादर करण्या करिता संबंधीत एकविध जिल्हा क्रीडा संघटने (असोसिएशन) (१) ज्या स्तरावरील क्रीडा स्पर्धाचा क्रीडा गुण सवलतीसाठी लाभ घ्यावयाचा आहे. त्या स्तरावरील क्रीडा स्पर्धे च्या आयोजनाचे परिपत्रक, (२) ज्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा क्रीडा गुण सवलतीसाठी लाभ घ्यावयाचा आहे. त्या स्तरावरील क्रीडा स्पर्धेच्या भाग्यप्रत्रिका, (३) ज्या स्तरावरील क्रीडा स्पर्धांचा क्रीडा गुण सवलतीसाठी लाभ घ्यावयाचचा आहे. त्या स्तरावरील क्रीडा स्पर्धेचे अंतिम निकालपत्र, (४) ज्या स्तरावरील क्रीडा स्पर्धाचा क्रीडा गुण सवलतीसाठी लाभ घ्यावयाचा आहे. त्या स्तरावरील क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूच्या नावाच्या प्राविण्यासहीत परिशिष्ट-१० मधील नमुन्यातील यादयांच्या ०२ प्रति. सदर कागदपत्रावर राज्यसंघटनेचे अध्यक्ष सचिव यांच्या शाईची स्वाक्षरी व शिक्का आवश्यक आहे, (५) एकविध खेळाच्या राज्य संघटनेचे अध्यक्ष व सचिव यांच्या शाईच्या नमुना स्वाक्षरीचे पत्र ही कागदपत्रे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत सादर करणे संबंधित संघटनेस बंधनकारक आहे. संघटने मार्फत वेळेत वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे सादर झाले नाही तर संबंधित खेळाडूचे प्रस्ताव बोर्डास सादर करणे शक्य होणार नाही, त्यास सर्वस्वी खेळाडू व संघटना जबाबदार राहील. इ. १० वी व इ. १२ वी विद्यार्थाचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्या करिता दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत आहे. दि. ३१ मार्च २०२६ रोजी नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची जिल्ह्यातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, खेळाडू विद्यार्थी यांनी नोंद घ्यावी, अधिकच्या माहिती करीता कार्यासन प्रमुख तथा क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील यांना ९६२३७८११२१ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

### अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे

**परिक्षा प्रवेशपत्र (Hall boket), प्रपत्र क्रमांक एक, प्रपत्र क्रमांक दोन, क्रीडा प्रमाणपत्र अधिकृत क्रीडा स्पर्धेत सहभाग घेतलेले प्रमाणपत्र, १२ वी करिता अर्ज करत असल्यास १० वी गुणपत्रक आवश्यक.**

# विशाल इंदुरे यांची पोलीस पाटील पदी निवड झाल्याबद्दल भव्य नागरी सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील दगडी शहाजनपूर गावच्या पोलीस पाटील पदासाठी कुणबी-मराठा समाजातून चि. विशाल प्रकाश इंदुरे यांची निवड झाल्याबद्दल गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थ, मित्रपरिवार व नातेवाईकांच्या वतीने त्यांच्या भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्कार सोहळ्यात श्री क्षेत्र नारायण गडाचे उत्तराधिकारी ह.भ.प. महंत संभाजी महाराज यांच्या हस्ते विशाल इंदुरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी इंदुरे यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत आशीर्वाद दिले. कार्यक्रमाला श्री क्षेत्र नारायणगडचे



विश्वस्त दिलीप गोरे, ॲड. महादेवराव तुपे, जे. पी. शेळके सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच गावच्या प्रथम नागरिक सौ. अनिता अण्णासाहेब धुताडमल, तांदळवाडीचे विद्यमान सरपंच श्रीराम सांगुळे, मा. पोलीस उपनिरीक्षक शांतीलाल गोरे, मा. उपसरपंच दत्तात्रय नवले, मा. चेअरमन बाबासाहेब सांगुळे, मा. सरपंच श्रीमंत इंदुरे, व्हॉइस चेअरमन भारत सांगुळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून विशाल इंदुरे यांचे अभिनंदन केले.

यावेळी धर्मराज गोरे, आबासाहेब सांगुळे, बबन गोरे, अमोल सांगुळे, नंदकिशोर खामकर, विक्रम गोरे, रमेश गोरे, अशोक गोरे, रोहिदास गोरे, मारुती गोरे, गणेश घोडके, अनुरथ सांगुळे, देवानंद गोरे, प्रभाकर गवंडे, सिताराम घोरड, दिलीप इंदुरे, राजाराम इंदुरे, विष्णू इंदुरे, महादेव इंदुरे आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. पोलीस पाटील म्हणून निवड झाल्यानंतर विशाल इंदुरे यांच्यावर गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची महत्त्वाची जबाबदारी येणार आहे. प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यामधील दुवा म्हणून काम करत गावात शांतता, सुव्यवस्था आणि एकोपा कायम ठेवण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या भव्य सत्कार सोहळ्यामुळे इंदुरे कुटुंबीयांसह ग्रामस्थांच्या आनंदात भर पडली असून, गावाच्या विकासासाठी आणि शांततेसाठी विशाल इंदुरे उत्तम कार्य करतील, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील कुर्ला येथील यश कोचिंग क्लासेस येथे दिनांक २३ मार्च २०२६ रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेनंतर भावपूर्ण निरोप देण्यात आला. विशेष म्हणजे, परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना निरोप देणारा हा उपक्रम जिल्ह्यातील पहिलाच असल्याचे बोलले जात आहे.



या निरोप समारंभात क्लासचे संचालक श्री. पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दहावीपूर्वीचे आणि दहावीनंतरचे आयुष्य यामध्ये मोठा बदल होतो. पुढील प्रवासात विद्यार्थ्यांनी स्वतःची जबाबदारी ओळखून पुढे जावे. जीवनात येणाऱ्या प्रत्येक संकटाला धैर्याने सामोरे जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, विद्यार्थ्यांनी आयुष्यात चिकाटीने व मेहनतीने मोठे यश संपादन करावे, चांगली संगत ठेवावी आणि योग्य मित्रपरिवाराची निवड करावी, असेही त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले. कोणत्याही क्षेत्रात काम करताना देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकी जपावी, प्रामाणिकपणा व नैतिकता कायम ठेवावी आणि भ्रष्टाचारापासून दूर राहावे, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले. यासोबतच, क्लासची आतापर्यंत १००% निकालाची परंपरा राहिली असून ती पुढेही अशीच कायम राहील, अशी आशाही पाटील सरांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. भविष्यात योग्य मार्ग निवडून आपल्या कुटुंबाचे, गावाचे, जिल्ह्याचे आणि देशाचे नाव उज्ज्वल करावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त करत क्लासमधील आठवणींना उजाळा दिला. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या वतीने क्लासेसला छत्रपती शिवाजी महाराजांची सुंदर मूर्ती भेट देण्यात आली, ज्यामुळे कार्यक्रमाला प्रेरणादायी आणि ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले. काही विद्यार्थ्यांनी आपले अनुभव मांडताना सांगितले की, क्लासेसमधून मिळालेले मार्गदर्शन त्यांच्या आयुष्यात कायम उपयोगी पडेल. शिक्षकांनी दिलेली शिस्त, शिक्षण आणि प्रेरणा यामुळेच आज ते आत्मविश्वासाने पुढे जात आहेत.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला आणि एकमेकांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हा निरोप समारंभ विद्यार्थ्यांसाठी अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.

# अस्मिता पिंच्याक सिलॅट लीग राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये बीडच्या मुलींचे उत्कृष्ट कामगिरी



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशन तर्फे तपोवनातील सर्वेश्वर महादेव ट्रस्टच्या इनडोअर हॉलमध्ये आयोजित अस्मिता राज्यस्तरीय पिंच्याक सिलॅट लीग 'स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी दिनांक २१ उपमहापौर विलास शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले .

या स्पर्धेमध्ये राज्यातील २२ जिल्ह्यामधून सुमारे ८०० महिला खेळाडूं सहभागी झाल्या होत्या उद्घाटन सोहळ्याची सुरुवात दीपप्रज्वलन आणि शिव प्रतिमा पूजनाने झाली यावेळी इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले , नगरसेविका सुवर्णा मटाले वन परीक्षेत्र अधिकारी राहुल वाघ, व तसेच इतर मान्यवर उपस्थित होते या स्पर्धेमध्ये

ऑल जिल्हा पिंच्याक सिलॅट असोसिएशन बीड तेरा महिला खेळाडूने सहभाग नोंदवला. सिल्वर मेडल - प्रांजल उत्तरेश्वर सपाटे , आरुषी लक्ष्मण जायभाय, ब्रांच मेडल - स्पर्शिका सपाटे ,प्रीती शिंदे , आराध्या पवार, आराध्या धुतावळ, वरील सर्व खेळाडू जिल्हा स्टेडियम बीड या ठिकाणी अध्यक्ष व प्रशिक्षक उत्तरेश्वर जगन्नाथ सपाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहेत फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले यांनी सांगितले की स्पर्धेतील विजेत्यांना झोनल स्तरावर ८ ते ४ हजार रुपये आणि राष्ट्रीय स्तरावर १० ते ६ हजार रुपये स्कॉलरशिप मिळणार आहे. पिंच्याक सिलॅट खेळामुळे सरकारी नोकरीमध्ये खेळाडूंना आरक्षण उपलब्ध असून उज्वल भविष्य घडवण्याची उत्तम संधी आहे. बीड जिल्ह्याचे सर्व खेळाडूंना फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले सर यांनी शुभेच्छा दिल्या तसेच बीड जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर सर व पिंच्याक सिलॅट सचिव जालिंदर इंगळे , मोसिन शेख, खेळाडूंना शुभेच्छा दिल्या व अभिनंदन केले.

## आठवणीची साठवण...१७ वर्षांनंतर जुळला आठवणींचा गोफ...

# निगमानंद विद्यालयाच्या २००९ च्या बॅचचे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

'शाळा' म्हटलं की डोळ्यांसमोर उभा राहतो तो बालपणीचा सुवर्णकाळ आणि जिवलग मित्र-मैत्रीण. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी निगमानंद विद्यालय, निमगाव (मा.) येथील सन २००९ च्या १० वीच्या बॅचचे स्नेहसंमेलन बीड येथील हॉटेल सनराईज मध्ये मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. तब्बल १७ वर्षांनंतर सर्व मित्र-मैत्रीण एकत्र आल्याने आनंदाला उधाण आले होते.



### गुरूजनांचा सन्मान आणि जुन्या आठवणींना उजाळा

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे ज्या शिक्षकांनी आयुष्याला आकार दिला, अशा आदरणीय शिक्षकांची उपस्थिती. या सोहळ्याला अर्जुन थिटे सर, बेंद्रे सर आणि डोंगरदिवे सर ,अशोक खोपडे सर,यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस आशीर्वाद दिले. शिक्षकांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

### विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती

या स्नेहसंमेलनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून माजी विद्यार्थी आवर्जून उपस्थित राहिले होते. कार्यक्रमात स्वाती थिटे (खुळे), आजिनाथ आंधळे, जगदीश लोणके (फौजी), विशाल खेडकर, आकाश काळे, राहुल आवनकर, भागवत मोरे, शहादेव गायकवाड, राणी लांडगे, जयश्री कातखडे, हनुमान सटले, रंजीत काळे, किरण कचरे, दादा ढेरे, शरद मोघे, कृष्णा सव्वाशे आणि तारा काळे यांची उपस्थिती होती.

तसेच अमोल (दादा) नन्नवरे, डॉ. मच्छिंद्र भोसले, नितीन सटले, मोनिका नंनवरे, गात गोकुळ, कमल ढेरे, वैशाली शिंगटे, सीमा कातखडे, इंदूबाई कातखडे, विकास कातखडे, निखिल देवकर, दीपा मावस्कर, अश्विनी भोसले, अर्चना शेळके आणि डॉ. संदीप सटले इत्यादी मित्र-मैत्रिणींनी सहभागी होऊन शालेय जीवनातील किस्से शेअर केले.

### सोहळ्याचे स्वरूप

स्वागत: सर्व गुरुजनांचे आणि मित्रांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

संवाद: अनेक वर्षांनंतर एकमेकांना भेटल्यामुळे प्रत्येकाने आपल्या करिअर आणि कौटुंबिक प्रवासाविषयी माहिती दिली.

### भोजन: स्नेहभोजनाचा आस्वाद घेत गप्पांचा कार्यक्रम रंगला.

सतराव्या वर्षी झालेल्या या भेटीने सर्वांचे मन भरून आले होते. शाळा सुटली तरी मैत्री सुटली नाही, अशी भावना यावेळी सर्वांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी पुन्हा लवकरच भेटण्याचे आश्वासन देऊन या अविस्मरणीय सोहळ्याची सांगता झाली.